जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव.
फेर जाहीर निविदा.

जळगांव जिल्हा न्यायालय व जिल्हा न्यायालयाचे अखत्यारीतील तालुका न्यायालयांमध्ये एकुण 17 बायोमेट्रीक प्रणाली (Biometrics X990 Attendance Machine) बसविण्यात आलेल्या आहेत.

सदर बायोमेट्रीक प्रणाली मशिनींचा (Biometrics X990 Attendance Machine) वार्षिक सेवा संविदेचा करार (Annual Maintenance Contract) दि.01.04.2025 ते दि.31.03.2026 या कालावधी करीता करण्यात आलेला आहे. सदर करार दिनांक 31.03.2026 पर्यंत असल्याने नव्याने वार्षिक सेवा संविदेचा करार करणे कमप्राप्त आहे.

या जाहीर निविदेव्दारे कळविण्यात येते की, जळगांव जिल्हा न्यायालय व जिल्हा न्यायालयाचे अखत्यारीतील तालुका न्यायालयांमध्ये एकुण 17 बायोमेट्रीक प्रणाली मशिनच्या देखभाली/दुरूस्तीसाठी कॉल बेसिस करार (Call Basis Contract) अथवा वार्षिक सेवा संविदेचा करार (Annual Maintenance Contract) करण्यासाठी ज्या पुरवठादारांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रक बंद पाकिटात म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने पाकिटावर "बायोमेट्रीक मशीन सेवा संविदा करार (Biometric Machine Annual Maintenance Contract)" असे नमुद करुन म. प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष कमांक 101 मध्ये दिनांक 17/04/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून द्यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 18/04/2026 रोजी म. जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

सदरचे दरपत्रकात कॉल बेसिस करार (Call Basis Contract) अथवा वार्षिक सेवा संविदेचा करार (Annual Maintenance Contract) यांचे दर स्वतंत्र नमुद करण्यात यावे तसेच बायोमेट्रीक मशिनसाठी आवश्यक असणा–या वस्तुंची यादीचे सर्वकरांसह दर नमुद करावे.

सर्वसाधारण अटी.

1 दरपत्रक स्विकृत केल्यावर सेवा संविदेचा करार आदेश दिल्यानंतर दि.01.05.2026 ते दि. 30.04.2027 मुदत 01 वर्ष वैध राहील.

2 दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

3 दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटीचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस अधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बिलाची रक्कम अदा करताना नियमानुसार टी. डी.एस. कपात करण्यांत येईल. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

4 दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी स्वतः अथवा प्रतिनिधी उपस्थित राहण्याची मुभा राहील अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील..

5 नमुद सेवा पुरवठा आदेश देवूनही पुरवठा मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

6 दरकराराची रक्कम दर सहा महिन्यांनी ठरलेल्या रक्कमेच्या निम्मे अधिक जीएसटी टॅक्ससह अदा केली जाईल.

7 मशिन नादुरुस्त झालेबाबत आपणांस कळविल्यानंतर 48 तासाच्या आंत मशिन दुरुस्त करुन दयावी लागेल.

8 जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव व उपरोक्त नमुद अखत्यारीत असलेले तालुका न्यायालयात दरमहा नियमीत भेट देवुन झेरॉक्स मशिनची पहाणी करण्यात यावी.

9 वरील पैकी कोणत्याही अटी शर्तींचा भंग झाल्यास तात्काळ करार रददबातल होईल.

10 कराराच्या कालावधीमध्ये कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता करार रदद करणेचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखुन ठेवलेला आहे.

11 बायोमेट्रीक मशिनची कोणतीही दुरूस्ती केल्यास त्याची नोंद लॉगबुकवर घेवुन दुरूस्ती अहवालावर संबंधीत कर्मचा–याचे समाधान झाल्यांनतर दुरूस्ती केल्याची स्वाक्षरी घ्यावी.

12 शासकिय सुटीचे दिवशी आवश्यकता पडल्यास व सुचना मिळाल्यास त्वरीत मशीन दुरूस्त करणे बंधनकारक राहील.

13 कोणत्याही प्रकारचे आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाही.

VJkamkar

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव.

म.जा.क./रोख शाखा/2१९६/2026
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक 09/04/2026.

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधीश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा न्यायालय, जळगांव यांच्या संकेतस्थळावर